**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**मा. राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी यांचा कुलगुरू डॉ. विलास भाले यांचे हस्ते सत्कार**

अमरावती.

महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून कार्यकारी कुलगुरू डॉ. विलास भाले यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे विद्यापीठाच्यावतीने उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. विलास भाले यांनी मा. राज्यपाल महोदयांशी संवाद साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या प्रगतीपर कार्याविषयी माहिती दिली. तसेच यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाच्यावतीने कुलगुरू डॉ. विलास भाले व कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी विद्यापीठाच्यावतीने कृषी संवादिनी ही दैनंदिनी व दिनदर्शिका देवून मा. राज्यपाल महोदयांचा सत्कार केला.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. ०५/०२/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी